अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल **aadmcgeneral@punecorporation.org**
अपिल क्र. ०४/२०१९
जा.क्र उआ (सा.प्र.)/99358 दि. 30/03/2019

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/०४/२०१९

**श्री सखाराम किसन पळसे**
पुणे महागरपालिका कामगार संघटना सरचिटणीस,
राष्ट्रीय मजदूर संघ, कॉंग्रेस भवन, शिवाजीनगर, पुणे ५

------------------ अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

**श्री सखाराम किसन पळसे** रा. पुणे महागरपालिका कामगार संघटना सरचिटणीस, राष्ट्रीय मजदूर संघ, कॉंग्रेस भवन, शिवाजीनगर, पुणे ५ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडे दि. २०.०२.२०१९ रोजी अर्ज करून "पुणे महानगरपालिकातील सेवकवर्ग विभाग (आस्थापना विभाग) पुणे मनपातील निरनिराळ्या खात्यामधील एकूण रिक्त पदे मोकदम, सफाई कामगार, वाहन चालक, ज्यू. क्लार्क यांची एकूण रिक्त पदे यांची संख्या बाबत संपूर्ण माहिती" मागितली होती.

अपिलार्थी यांचे मुळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/१०७६५ दि. ०८.०३.२०१९ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| २०.०३.२०१९ | २०.०२.२०१९ | २२.०३.२०१९ | ०८.०३.२०१९ | - |

अपिलार्थी यांचे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी दिलेल्या उत्तराने समाधान न झाल्याने त्यांनी अपील क्र. ०४/२०१९ चा अपील अर्ज दि. ०१६.०३.२०१९ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| १६.०३.२०१९ | १६.०३.२०१९ | ०७.०४.२०१९ | होय | - |

सदर प्रकरणी दि. २९.०३.२०१९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी **श्री सखाराम किसन पळसे रा.** पुणे महागरपालिका कामगार संघटना सरचिटणीस, राष्ट्रीय मजदूर संघ, कॉंग्रेस भवन, शिवाजीनगर, पुणे ५ हे उपस्थित होते. श्री रवींद्र शेंडगे **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**, आस्थापना विभाग, पुणे मनपा हे उपस्थित होते.

**विवेचन**

अपिलार्थी **श्री सखाराम किसन पळसे रा.** पुणे महागरपालिका कामगार संघटना सरचिटणीस, राष्ट्रीय मजदूर संघ, कॉंग्रेस भवन, शिवाजीनगर, पुणे ५ यांनी यांना पूर्ण माहिती मिळाली नाही असे प्रतिपादन केले तर श्री रवींद्र शेंडगे **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**, आस्थापना विभाग, पुणे मनपा यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/१०७२५ दि. ०८.०३.२०१९ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे असे प्रतिपादन केले.

## आदेश

अपिलार्थी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील जी माहिती कार्यालयात उपलब्ध आहे व अपिलार्थीस मिळाली नाही अशी माहिती ७ दिवसात **जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**, आस्थापना विभाग, पुणे मनपा यांनी अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. अपील क्र. ४/२०१९ निकाली काढण्यात येत आहे.

(अनिल मुळे)
अपिलीय प्राधिकारी
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका